# " महाराष्ट्रातील लेणी "

प्रस्तुत प्रकल्प

## विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

(स्वायत्त)

(स्वायत्त) कोल्हापूर

कला शाखा पदव्युत्तर पदवी इतिहास विभाग


**प्रकल्पकर्ती**

**अस्मिता बाजीराव ठाणेकर**

**मार्गदर्शक**

**डॉ. एस. आर. कट्टीमनी**


इतिहास विभाग विवेकानंद कॉलेज , कोल्हापूर

२०२५



Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| अ.क्र | घटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रतिज्ञापत्र | ३ |
| २. | प्रमाणपत्र | ४ |
| ३. | प्रस्तावना | ५ |
| ४. | लेणी अभ्यासासाठीचे संदर्भ | ६ |
| ५. | लेण्यांची मुख्य उद्दिष्टे | ७ |
| ६. | लेणी म्हणजे काय ? | ८ |
| ७. | १. अजिंठा लेणी | ९ |
| ८. | २. वेरूळ लेणी | २२ |
| ९. | ३. घारापुरी लेणी — एलिफंटा लेणी | ३३ |
| १०. | ४. कान्हेरी लेणी | ३८ |
| ११. | ५. नाणेघाटाची लेणी | ४० |
| १२. | ६. पितळखोरे लेणी | ४२ |
| १३. | ७. अंकाई लेणी | ४४ |
| १४. | ८. आगाशिव लेणी | ४७ |
| १५. | ९. पन्हाळे — काजी लेणी | ४९ |
| १६. | १०.भाजे लेणी | ५४ |


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner

# प्रतिज्ञापत्र

मी (विद्यार्थ्यांचे नाव) कु. अस्मिता बाजीराव ठाणेकर. विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे एम.ए. इतिहास भाग-1 /2 वर्गात शिकत असून असे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत करतो की सत्र III/IV/V च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प (प्रकल्पाचे नाव) महाराष्ट्रातील लेणी हा मी स्वतः क्षेत्रभेट घेवून व इतर उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा आढावा घेवून तयार केला आहे. पूर्वी सादर झालेल्या कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करून अथवा इतर कोणाकडूनही लिहून घेवून हा प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही .

दिनांक: 17 / 04 / 2025

ठिकाण: कोल्हापूर

विद्यार्थ्यांची सही: ______

विद्यार्थ्यांचे नाव: अस्मिता बाजीराव ठाणेकर.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (अधिकारप्रदत्त स्वायत्त) येथे एम.ए. इतिहास भाग-1 /2 वर्गात शिकत असलेला विद्यार्थी (विद्यार्थ्यांचे नाव) कु. अस्मिता बाजीराव ढाणेकर. सत्र III/IV/V च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प (प्रकल्पाचे नाव) महाराष्ट्रातील लेणी हा या विद्यार्थ्यांने स्वतः तयार केलेला असून, आमच्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदव्युत्तर पदवीच्या अभ्यासक्रमासाठी सादर झालेला नाही. सदर प्रकल्प अहवाल माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरीत्या पूर्ण झालेला आहे.

**दिनांक:** 17 / 04 / 2025

**ठिकाण:** कोल्हापूर

17/4/25

डॉ. एस . आर. कट्टीमनी

**HEAD**
**DEPARTMENT OF HISTORY**
**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR**
**(EMPOWERED AUTONOMOUS)**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner

# प्रस्तावना

महाराष्ट्राची वैशिष्ट्यापैकी अनेक वैशिष्ट्ये सांगता येतील, त्यांतील एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'लेणी'.

ज्याप्रमाणे किल्ल्यांच्या बाबतीत महाराष्ट्र सर्व जगात पुढे आहे, तसेच, लेण्यांच्या बाबतीतही महाराष्ट्र अग्रेसर आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक प्राचीन आणि ऐतिहासिक लेणी आहेत, ज्यात अजिंठा, वेरूळ, कान्हेरी आणि अगाशिव लेणी यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील एकूण लेण्यांची संख्या निश्चितपणे सांगणे कठीण आहे, कारण काही लेणी अजून शोधलेली नाहीत किंवा त्यांच्या नोंदी व्यवस्थित ठेवलेल्या नाहीत. तरीही, महाराष्ट्रात अनेक प्रसिद्ध आणि ऐतिहासिक लेणी आहेत,

ज्या ऐतिहासिकदृष्ट्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या खूप महत्त्वाच्या आहेत. लेणीतील प्रत्येक खोली, विहार, चैत्यगृह हे स्वतंत्र लेणी धरल्यास हा आकडा हजारोच्या संख्येत होऊ शकेल.

इथली बहुसंख्य प्रजा आणि इथले राजे धर्माने बौद्ध आणि जैन नसूनही त्यांनी जैन-बौद्ध लेण्यांच्या उभारणीला भरभरून साहाय्य केले हे वैशिष्ट्यपूर्ण या लेण्यांमध्ये दिसून येते.

महाराष्ट्राचे हे आगळेपण निश्चितच आनंददायी नि अभिमानास्पद आहे. ही लेणी बहुजनांच्या साहाय्याने खोदलेली आहेत हे त्यांचे एक वैशिष्ट्य आणि दुसरे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्राची धार्मिक सहिष्णुता !

लेणी हा आपला महान अलंकार आहे, वैभव आहे. समृद्ध सांस्कृतिक ठेवा आहे.अशा लेण्यांचा इतिहास सुमारे दोन-सव्वादोन सहस्र वर्षांचा आहे. डोंगरात खोदलेली ही लेणी हे अद्भुत शिल्प बघून मनुष्य थक्क होतो. लेणी पाहाणे, अभ्यासणे, हा मोठाच आनंद आहे. ही लेणी आपल्याला प्राचीन काळात घेऊन जातात.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner

# लेणी अभ्यासासाठीचे संदर्भ

१. सुशील दुधाणे यांच्या " भटकंती (प्राचीन लेणी व मंदीरांची) " या पुस्तकातून काही लेणींची माहितीचा आधार घेतला आहे.

२. सूरज पंडित यांच्या " महाराष्ट्रातील बौद्ध लेणी – महाराष्ट्रातील बौद्ध लेणी " या पुस्तकातून काही बौध्द लेण्यांच्या स्मारकांचा परिचयाची माहितीचा आढावा घेणेत आला आहे.

३. एस. एच. जोशी यांच्या " महाराष्ट्रातील लेणी " हे पुस्तक लेण्यांच्या इतिहासावर, स्थापत्यशैलीवर आणि शिल्पकलेवर प्रकाश टाकते. महाराष्ट्रातील लेण्यांबद्दल माहिती देणाऱ्या अश्या पुस्तकातून माहितीचा आधार घेणेत आला आहे.

४. " इंटरनेट Chatgbt " या माध्यमातून काही लेण्यांची माहिती आधार घेणेत आला आहे. तसेच काही लेण्यांची छायाचित्रे ही " इंटरनेट " माध्यमातून घेणेत आली आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner

# लेण्यांची मुख्य उद्दिष्टे

लेण्यांची उद्दिष्टे अनेक होती. प्रामुख्याने, ही लेणी भिक्खू आणि संन्यासी लोकांना तपस्या, साधना आणि विश्रांतीसाठी आश्रय देण्यासाठी वापरली जात होती. या व्यतिरिक्त, काही लेण्यांमध्ये धार्मिक कलाकृती आणि चित्रांचे प्रदर्शन देखील केले जात होते, ज्यामुळे त्या ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाच्या ठरल्या.

**आश्रय:**

लेण्यांमध्ये भिक्खू, संन्यासी आणि इतर धार्मिक लोक निवासस्थान आणि आश्रय शोधू शकत होते.

**तपस्या आणि साधना:**

लेण्यांमध्ये शांत आणि नैसर्गिक वातावरण असल्याने, लोक तपस्या, ध्यान आणि इतर साधना करू शकत होते.

**कला आणि स्थापत्य:**

काही लेण्यांमध्ये उत्कृष्ट कलाकृती आणि स्थापत्यशास्त्र प्रदर्शित केले जात होते, जसे की अजिंठा, वेरूळच्या लेण्या इ.

**धार्मिक प्रदर्शन:**

लेण्यांमध्ये विविध धार्मिक परंपरा आणि कथा दर्शवण्यासाठी चित्रे आणि शिल्पे कोरलेली होती.

**उदाहरणार्थ:**

**अजिंठा लेणी:** या लेण्यांमध्ये बौद्ध धर्माचे विविध प्रसंग आणि विभूती दर्शवण्यासाठी चित्रे कोरलेली आहेत, ज्यामुळे त्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या खूप महत्त्वाच्या आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous)
ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner

# लेणी म्हणजे काय ?

लेणी म्हणजे डोंगर, टेकडी, पर्वत, खडक कोरून तयार केलेल्या गुहा होत. ज्यांच्या उपयोग संन्यासी, भिक्खूंना तपस्या,साधना करणे अथवा विश्रांती घेणे ह्यासाठी केला जाई. ही लेणी प्रामुख्याने सातवाहन, वाकाटक व राष्ट्रकूट या राजवंशाच्या काळात कोरली गेली आहेत. अशा वैशिष्ट्यपूर्ण लेण्यांमध्ये महाराष्ट्रातील अजिंठा, कार्ले, कान्हेरी, घारापुरी, पितळखोरे, भाजे, वेरूळ ही जगप्रसिद्ध लेणी आहेत.

लेण्यांमध्ये चैत्यगृहे, विहार व मंदिर यांचा समावेश असतो. प्रारंभी या लेणी अनलंकृत असाव्यात; परंतु पुढे त्यामधे शिल्पे व मूर्ती खोदण्यात आल्या. तसेच लेण्यांतील भिंतीवर चित्रे कोरून त्या सुशोभित करण्यात आल्या. लेण्यांना शैलगृहे, शिलामंदिरे असेही म्हणतात. लेण हा शब्द संस्कृत लयन- गृह या शब्दावरून आला असावा.

लेण्याच्या माहितीबाबत एक ढोबळमानाने असलेली गोष्ट अशी की, पुरातन काली बौद्ध भिक्खु हे धम्म प्रसारार्थ भारतभर फिरत असत. त्यांचे दिनचर्येचे पाळायचे नियम कडक असत. ते नियम पाळणे सुलभ व्हावे आणि धम्मप्रसारार्थ फिरणाऱ्या भिक्खुंची ध्यानधारणेची सोय सहज व्हावी ह्यासाठी तत्कालीन राजांनी अशी लेणी खोदून घेतली. अशी लेणी लेण्याद्री, जुन्नर परिसर, कार्ले, भाजे, नाशिक येथे पाहण्यास मिळतात. बहुतेक प्रत्येक लेण्यातते लेणे ज्याने खोदविले त्याच्या नावाचा उल्लेख शिलालेखातून सापडतो.

संपूर्ण भारतात आज माहिती असलेली सुमारे एक हजार लेणी असून त्यापैकी शंभर लेणी ही हिंदू व जैन आहेत. उरलेली 900 ही बौद्धांची आहेत असे मानले जाते. सातवाहन काळ व त्यानंतर परदेशी व्यापाऱ्यांशी होणाऱ्या व्यापारामुळे आलेली भरभराट ही या लेण्यांच्या निर्मितीला मदत करणारी ठरली असे मानले जाते.


लेण्यांच्या अभ्यासातून त्या त्या प्रांताचा राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक इतिहास आपल्याला माहिती होतो.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner

# १. अजिंठा लेणी




अजिंठा लेणी ह्या तालुका सोयगाव छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील इ.स. पूर्व २ रे शतक ते इ.स. ४ थे शतक अशा प्रदीर्घ कालखंडात निर्मिलेल्या २९ बौद्ध लेणी आहेत. छत्रपती संभाजीनगर शहरापासून १०० ते ११० कि.मी. अंतरावर वाघूर नदीच्या परिसराशेजारी या लेणी आहेत. ह्या लेणी नदीपात्रापासून १५-३० मीटर (४०-१०० फूट) उंचीवर विस्तीर्ण अशा डोंगररांगामधील कातळांवर कोरल्या आहेत.

बौद्ध धर्माचा वारसा जतन करणारी प्रदीर्घ ऐतिहासिक कालखंडाची पार्श्वभूमी लाभलेली अजिंठा लेणी या भारताची जागतिक आंतरराष्ट्रीय पर्यटनासाठी ठळक ओळख करून देणाऱ्या महत्त्वाच्या लेणी आहेत. लेणी घनदाट जंगलाने वेढलेल्या आहेत. भारताच्या केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या प्रतिष्ठित पर्यटन स्थळ प्रकल्पात देशातील १२ पर्यटन स्थळांची निवड करण्यात आली असून महाराष्ट्रातील अजिंठा लेण्यांचा या यादीत समावेश आहे. अजिंठा लेणी ही जागतिक वारसा स्थान म्हणून युनेस्कोने इ.स. १९८३ साली घोषित आणि या लेण्यांना भारतातील पहिल्या जागतिक वारसा स्थळाचा मान आहे. जून २०१३ मध्ये महाराष्ट्राच्या सात आश्चर्यांची घोषणा करण्यात आली.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner




अजिंठा लेण्यांत गौतम बुद्धाच्या विविध भावमुद्रा तसेच बौद्ध तत्त्वज्ञानाला चित्रशिल्प रूपात व्यक्त करणाऱ्या शिल्पकलेचा अद्वितीय आविष्कार पाहायला मिळतो. अशी ही अजिंठा लेणी देशी पर्यटकांसोबतच प्रामुख्याने विदेशी पर्यटकांच्या सर्वाधिक पसंतीचे पर्यटन स्थळ ठरले आहे. चित्र—शिल्पकलेचा नितांतसुंदर अनुभव देण्याऱ्या या लेण्यांमधून त्या काळात वापरण्यात आलेल्या रंगछटा पर्यटकांना पाहावयास मिळता.




*अजिंठा लेणीतील चित्रस्तूपावर कोरलेली बुद्धमूर्ती *



Scanned with OKEN Scanner

या लेण्यांचा शोध ब्रिटिश भारताच्या मद्रास इलाख्यातील ब्रिटिश अधिकारी जॉन स्मिथ हा वाघाच्या शिकारीसाठी गेल्याने २८ एप्रिल, इ.स. १८१९ रोजी लागला. स्मिथने येथील दहाव्या क्रमांकाच्या लेणीतील एका खांबावर आपले नाव आणि तारीख कोरून ठेवल्याचे आजही अंधुकपणे दिसून येते. पुरातत्त्वशास्त्रीय पुराव्यानुसार ही लेणी दोन वेगवेगळ्या कालखंडांत निर्माण केली गेली. ९, १०, १२, १३ व १५-अ ही लेणी हीनयान कालखंडात कोरली गेली असावीत. हा कालखंड साधारणतः इ.स. पूर्व दुसऱ्या शतकाच्या सुमारास सुरू झाला. या सगळ्या लेण्यांतून बुद्धांचे दर्शन स्तूप-रूपांत होते. या व्यतिरिक्त १ ते २९ क्रमांकांची लेणी साधारणतः ८००-९०० वर्षांनंतर (इ.स.च्या सहाव्या व सातव्या शतकाच्या आसपास) महायान कालखंडात निर्माण केली गेलेली असावीत. या लेण्यांतून बुद्धांचे सर्वसामान्य लोकांस परिचित असे रूप दिसून येते. महायान लेणी वाकाटक राजांच्या राजवटीत निर्मिली गेली, त्यामुळे त्यांस बऱ्याचदा *वाकाटक लेणी* असेही संबोधले जाते. वाकाटक साम्राज्याच्या ऱ्हासानंतर लेण्यांची निर्मिती अचानक थांबली व ही लेणी योजित भव्यतेपासून वंचितच राहिली.

**इतिहासातील नोंदी :** मध्ययुगातील अनेक चिनी बौद्धधर्मीय प्रवाशांनी अकबराच्या काळापर्यंत उपलब्ध असलेल्या आपल्या प्रवासवर्णनांत या लेण्यांचा उल्लेख केला आहे. जंगलाने वेढलेल्या असल्याने या लेणी अज्ञात होत्या.

**बौद्ध संप्रदायाचे प्रतिबिंब :** अजिंठा निर्मिती करणाऱ्या कलाकारांनी विहार आणि चैत्य अशा दोन प्रकारे या लेण्यांची निर्मिती केलेली आहे. या लेण्यांमधील भिंती आणि छतांवर चितारलेल्या चित्रांमधून भगवान बुद्धांच्या जीवनातील विविध प्रसंग आणि अनेक बौद्ध विभूतींचे चित्रण आढळते. जातक कथांच्या आधारे केलेले कथांचे अंकन या लेण्यांमध्ये दिसून येते. शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून येथील शिल्पे जगभरात मान्यता पावली आहेत. चित्रांमधून व्यक्त होणाऱ्या मानवी भावभावना हे या चित्रांचे वैशिष्ट्य आहे.









बौद्ध धर्मातील हीनयान आणि महायान अशा दोन संप्रदायांचे तत्त्वज्ञान अजिंठा लेण्यात पाहायला मिळते. उत्खनने आणि बौद्ध धर्माचे उपलब्ध साहित्य याच्या आधारे अभ्यासक विविध मते नोंदवीत असतात. त्यांच्या मतानुसार हीनयान संप्रदायाच्या लेण्यांमध्ये चैत्यगृह पाहायला मिळते, मात्र महायानपंथीय लेण्यात चैत्यगृहांचा समावेश नसतो. चैत्यगृह म्हणजे स्तूप असलेले मंदिर होय.


अजिंठा येथे एकूण २९ लेण्यांपैकी हीनयान कालखंडातील लेण्यांमधली ९ व्या व १० व्या क्रमांकाची लेणी ही चैत्यगृहे आहेत व १२, १३, आणि १५-अ क्रमांकाचे लेणे हे विहार आहे. महायान कालखंडातील लेण्यांपैकी १९, २६ व २९ क्रमांकाची लेणी चैत्यगृहे असून १, २, ३, ५, ६, ७, ८, ११, १४, १५, १६, १७, १८, २०, २१, २२, २३, २४, २५, २७ व २८ क्रमांकांची लेणी विहार आहेत.

**आता काही गुंफांचा परिचय करून घेऊया.**

**गुंफा क्र.** 4 - ही गुंफा सर्वांत मोठी आहे. सोप्याची लांबी ८७ फूट, रुंदी १२ फूट व उंची १६ फूट आहे. त्यात आठ अष्टकोनी स्तंभ असून, दोन्ही बाजूंना दोन दालने आहेत. गणेशपट्टीवर बुद्धमूर्ती, चैत्य, शार्दूल वगैरे कोरलेले आहेत. दाराच्या उजव्या बाजूला अवलोकितेश्वराची प्रतिमा व डाव्या बाजूला बुद्धमूर्ती आहे. अवलोकितेश्वर म्हणजे महान बोधिसत्त्व, मानवांकडे करुणादृष्टीने पाहणारा ईश्वरच होय.



Scanned with OKEN Scanner



**गुंफा क्र. ६** - ही गुंफा इतर गुंफांपेक्षा वेगळी आहे. तिच्यात दोन मजले आहेत. अंतराळात, दोन्ही अंगांना 'श्रावस्तीचे विश्वरूप' आणि 'माराचे मोहजाल' ही चित्रे रंगविलेली दिसतात. श्रावस्ती हे उत्तर प्रदेशातील प्राचीन नगर. देय इथे खूप बौद्ध आणि जैन अवशेष मिळाले आहेत. आणि मार म्हणजे एक दुष्ट देवता साधकांना भुलवून मार्गभ्रष्ट करणे हे तिचे काम. भगवान गौतम बुद्धांची समाधी भग्न करण्यासाठी माराने खूप प्रयत्न केले पण शेवटी तो हरला आणि गौतम हे बुद्ध झाले.



**गुंफा क्र. ९** - या लेण्यात हीनयान पंथाचे, सनपूर्व १ ल्या शतकात खोदलेले चैत्यगृह आहे. त्याच्या दर्शनी भागात विशाल चैत्य तोरण दिसते. ते अगदी साधे आहे.




**गुंफा क्र. १२ ते १५** - ही सगळी विहारलेणी असून, त्यांत मंडपाभोवती भिक्षूच्या खोल्या आहेत. खोल्यांमध्ये दगडी बाके आहेत. सगळ्यांची रचना सारखीच आहे. शिल्पकाम साधे असून काही भाग पडलेला दिसतो.



**गुंफा क्र. १६** - इथली १६, १७ व १९ या क्रमांकांची लेणी स्थापत्य व चित्रकला या दोन्ही दृष्टींनी भारतातल्या कुठल्याही लेण्यांपेक्षा उत्कृष्ट आहेत, असे बर्जेसने म्हटले आहे. यातले १६ वे लेणे वाकाटक नृपती हरिषेण (इ. स. ४७५ ते ५००) याच्या वराहदेव नावाच्या सचिवाने आपल्या मातापित्यांच्या पुण्योपचयासाठी खोदविले आहे. लहान स्तंभांवर दोन्ही अंगी मकरवाहना म्हणजे मगर हे जिचे वाहन आहे

अशा गंगेची मूर्ती खोदलेली आहे. बुद्धाची भव्य मूर्ती सिंहासनावर अधिष्ठित असून, ती धर्मचक्रप्रवर्तनमुद्रेत आहे. बुद्धाच्या मुखाभोवती तेजोवलय असून, त्याच्या दोन्ही अंगी वज्रपाणी व पद्मपाणी चवऱ्या घेऊन उभे आहेत.





या १६ व्या लेण्यात मुख्यत्वे बुद्धाच्या शेवटच्या जन्मातले प्रसंग चित्रित झाले आहेत. मायादेवीचे स्वप्न, बुद्धजन्माचा देखावा, असित ऋषीचे भविष्यकथन, बाल गौतम पाटीवर धुळाक्षरे काढीत असल्याचे दृश्य, त्याचे धनुर्विद्येचे शिक्षण, सुजातेने त्याला केलेले पायसदान, बुद्धाची राजगृहातील भिक्षा, बुद्धाचा धर्मोपदेश, अजातशत्रू बुद्धाच्या दर्शनाला आल्याचे दृश्य; नंदाचा धर्मप्रवेश, बुद्ध राजवाड्यात आले असता त्यांची पत्नी यशोधरा व पुत्र राहुल त्यांना सामोरे आल्याचे दृश्य.



१६ क्रमांकाच्या लेण्यापुढून खाली उतरले असता नागराजाचे लहानसे लेणे लागते. अजंठ्याची लेणी नाग कारागिरांनी खोदली असल्याने त्यांमध्ये नागराजांच्या प्रतिमा अनेक ठिकाणी कोरल्या गेल्या आहेत, असे म्हणतात.



**गुंफा क्र. १७ -** हे लेणे विहारपद्धतीचे असून, ते क्रांतिवृत्ताचे लेणे म्हणून प्रसिद्ध आहे. संसाराला पुष्कळदा चक्राची उपमा देतात. या भव्य चक्राचे आठ भाग करण्याचा उद्देश होता, असे दिसते; पण त्याचे पाचच भाग चक्राच्या तुंब्यापासून परिघापर्यंत जाणाऱ्या अंतरांनी विभागले आहेत. या चक्रामध्ये जीवनाचे विविध पैलू रंगविले आहेत. उदाहरणार्थ - शेतकऱ्याची घरे, त्यांचे साधे जीवन, त्यांची जनावरे, नगरातील नाचरंग, प्रेमीयुगुलांचे विविध पत्नी सुंदरी हिच्याकडे एका सेवकाने आणून दिला व तो पाहून सुंदरी शोकावेगाने मरणोन्मुख झाली, हा त्या चित्राचा विषय आहे. मरणोन्मुख अवस्थेमुळे तिची मान गळून पडली आहे. ती खाली पडू नये म्हणून एक दासी तिला सावरून धरीत आहे व दुसरी शोकविव्हल दृष्टीने तिच्याकडे पाहत आहे. तसे करताना ती एका हाताने सुंदरीची नाडी पाहत आहे व दुसरा हात तिने आपल्या धडधडत्या हृदयावर ठेवला आहे. पंखा धारण करणारी आणखी एक दासी विकलांग अवस्थेत उभी आहे. जवळच काही सेवक असून, ते सुंदरीच्या अखेरच्या अवस्थेबद्दल दुःख करीत आहेत. मोरही शोकाकुल झाला असून, तो आपली मान लांब करून जणू त्या दासींचे बोलणे ऐकत आहे.




Scanned with OKEN Scanner






**गुंफा क्र. २०-२५** - या गुंफांत लहानमोठे विहार आहेत. काही लेण्यांत चैत्यही आहेत. 20 क्रमाकांच्या गुंफेच्या आता सात मानुषी बुद्ध कोरलेले आहेत. 23 व 24 क्रमांकांच्या गुंफांतील शिल्पकाम सुंदर आहे.






Scanned with OKEN Scanner






**गुंफा क्र. २६** - हे लेणे एक चैत्यगृह आहे. मंडपाची लांबी ६८ फूट, रुंदी ३६ । फूट व उंची ३१ । फूट आहे. त्यातील स्तंभ खूप उंच असून, त्यावर विपुल नक्षीकाम आहे. मंडपाच्या डाव्या बाजूच्या भिंतीत बुद्धाच्या महापरिनिर्वाणाचा प्रसंग कोरलेला आहे. गौतम बुद्धाच्या मूर्तीची लांबी तेवीस फूट आहे. तरीही त्याचे अवयव, वस्त्रे, मुद्रेवरील भाव हे सर्व सुरेख, हुबेहूब दिसतात. बुद्धाची मुद्रा शांत आहे, पण त्याच्या मंचकाजवळ असलेल्या सर्व शोकग्रस्त व्यक्तींच्या मुखावर दुःखाची छाया पसरलेली स्पष्ट दिसते. वर गंधर्व-अप्सरांचे थवेही कोरलेले दिसतात. या चैत्यगृहात बुद्धाच्या असंख्य मूर्ती जागोजागी दिसतात.





Scanned with OKEN Scanner



अजंठ्याच्या चित्रकलेने मोहून जाणार नाही, असा प्रेक्षक विरळा ! अजंठ्याच्या चित्रांनी रसिकांसमोर एक सजीव अशी कलासृष्टी उभी केली आहे. तत्कालीन चित्रकारांनी या गुंफांमध्ये विलासी आणि धार्मिक अशा उभयविध जीवनाच्या विविध अवस्था चितारून ठेवल्या आहेत. या गुंफांमध्ये भारतीय इतिहासाच्या सुवर्णयुगातली कला आपल्या संपूर्ण समृद्धीसह अवतीर्ण साठी आहे. पद्मपाणी अवलोकितेश्वर ह्या चित्राला तर तोड नाही. अजंठा येथील चित्रसृष्टीचा प्रभाव सर्व भारतावर पडसच पण मध्य आशिया, ब्रह्मदेश, श्रीलंका, चीन आणि जपान या देशांवरही त्या चित्रकलेने लाप टाकली.

भारतीय चित्रकलेची परंपरा अजंठा येथील चित्रकलेपासून प्रारंभित होते असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.


**अजिंठ्यातील चित्रकला**





*प्रसिद्ध चित्र*











Scanned with OKEN Scanner


# २. वेरूळ लेणी



ही छत्रपती संभाजी नगर शहरापासून ३० कि.मी. अंतरावरील वेरूळ गावातील जगप्रसिद्ध लेणी आहेत. ही सह्याद्रीच्या सातमाळा पर्वत रांगेतील डोंगरकड्यात साधारणतः पाचव्या ते दहाव्या शतकाच्या कालखंडात कोरलेल्या एकूण ३४ लेणी आहेतहे मराठवाड्यातील जगप्रसिद्ध स्थान होय. गावाजवळून इला नदी वाहते. तिच्या तीरावर घृष्णेश्वराचे मंदिर आहे. ते बारा ज्यातिर्लिंगापैकी एक मानले जाते. छत्रपती शिवाजीमहाराजांचे आजोबा मालोजीराव भोसले हे वेरूळचे पाटील होते. श्रीघृष्णेश्वर मंदिरात दास मालोजी आणि दास विठोजी ह्यांचा शिलालेख आहे.

वेरूळ हे गाव जगद्विख्यात झाले आहे, ते गावाच्या पश्चिमेला दीड किमीवरील डोंगरात खोदलेल्या लेण्यांमुळे. भारतातील सर्व लेण्यांत ही लेणी उत्कृष्ट मानली जातात. ही लेणी उभ्या पहाडात खोदलेली नसून, डोंगराच्या उतारावर आहेत. हा डोंगर दक्षिणोत्तर पसरलेला असून, त्याचा आकार चंद्रकोरीसारखा आहे.

त्यांतील दक्षिणेकडील बारा गुंफा बौद्ध पंथाच्या, उत्तरेकडील पाच गुंफा जैन पंथाच्या आणि त्या दोन्हींच्या मधल्या सतरा गुंफा ब्राह्मणी म्हणजे वैदिक पद्धतीच्या आहेत. बौद्ध लेणी इ. स. ५५०-८०० या कालखंडातली असून, ती महायान पंथाची आहेत. त्यांत एकच चैत्यगृह असून, बाकीची बुद्धप्रतिमायुक्त विहारगृहे आहेत.




इ. स. ६५० नंतर इथल्या ब्राह्मणी वैदिक गुंफांची निर्मिती सुरू झाली. त्यांतील कैलास मंदिर हे अत्यंत सुंदर लेणे राष्ट्रकूट राजा कृष्णराज (पहिला) याने इ. स. च्या ८ व्या शतकात निर्माण केले. जैन लेणी इ. स. च्या ९ व्या व १० व्या शतकांतली असून, ती राष्ट्रकूट वंशातील अमोघवर्ष (पहिला) (इ. स. ८१४ ते ८७८) किंवा कृष्णराज (दुसरा) (८७८-९१४) यांच्या वेळी खोदलेली आहेत.

वेरूळचे मूळ नाव एलापूर असे होते. राष्ट्रकूटांच्या एका ताम्रपटात एलापूरच्या शिवमंदिराची म्हणजे कैलास लेण्याची अतिशय प्रशंसा केली आहे. ते एलापूर म्हणजेच वेरूळ होय. एलापूरचा अपभ्रंश होऊन वेरुळ हे नाव त्या गावाला मिळाले असावे, असे काही मत आहे. इंग्रजी 'एलोरा' हा एलापूरचाच अपभ्रंश होय.

**लेणी क्र. १ व २** - ही अगदी साधी आहेत. त्यात भिक्षूसाठी आठ खोल्या आहेत. हा सर्वांत प्राचीन विहार असावा. दुसरे लेणे म्हणजे चैत्यगृहच असावे. एका बाजूला उच्चासनावर जंभलाची तुंदिलतनू मूर्ती आहे. तो बौद्धांचा कुबेर होय. मथुरा, मगध, सारनाथ, बंगाल, नेपाळ, वायव्य सीमाप्रांत, अफगाणिस्थान, तिबेट इथे जंभलाच्या मूर्ती आढळतात. चीनमधील पेकिंगच्या मूर्ति संग्रहालयात जंभलाची मूर्ती आहे. मंडपाला बारा भव्य स्तंभ असून, त्याच्या दोन्ही बाजूंना बुद्धांच्या प्रचंड मूर्ती आहेत. या सर्व मंडपात नाजूक नक्षी कोरली आहे. या मंडपाच्या भिंतीत तारा व बोधिसत्त्व यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

या मंडपाच्या मागे गाभारा आहे. त्याच्या द्वारावर प्रचंड द्वारपाल आहेत. गाभाऱ्यात सिंहासनावर बसलेली बुद्धांची प्रचंड मूर्ती धर्मचक्रप्रवर्तन मुद्रेत आहे.



Scanned with OKEN Scanner

**लेणी क्र. ५** - हा एक प्रशस्त विहार आहे. त्यात २४ स्तंभ आहेत. मागच्या भिंतीत बुद्धमूर्तियुक्त मंदिर आहे. त्यात बुद्धांची प्रचंड मूर्ती आहे. या लेण्याच्या माथ्यावरून एक जलप्रवाह पुढच्या दरीत सतत कोसळत असतो.

**लेणी क्र. ६** - हे लेणेही खूप प्रशस्त आहे. पाठीमागे बुद्धमंदिर असून, मंडपाच्या दोन्ही बाजूंना दोन मोठे मंडप आहेत. उजव्या बाजूच्या भिंतीत महामायूरीची प्रतिमा कोरलेली आहे व डाव्या बाजूच्या भिंतीत तारादेवीची. या सर्व मूर्तीची घडण सुबक आहे. प्रवेशद्वाराची चौकट आणि द्वारपाल यांच्यामध्ये गंगा व यमुना यांच्या सुबक मूर्ती दिसतात. गाभाऱ्यात बुद्धाची भव्य बैठी मूर्ती आहे. महामायूरी नि तारादेवी ह्या बौद्ध देवता होत.

**लेणी क्र. १०** - हे लेणे विश्वकर्मा या नावाने प्रसिद्ध आहे. याला सुतार लेणे असेही म्हणतात. याचे कारण हे असावे, की या लेण्यात प्राचीन काष्ठशिल्पाचे अनुकरण केलेले दिसते. लाकडी फासळ्यांसारख्या फासळ्या दगडात कोरून काढलेल्या आहेत. हे एक चैत्यगृह आहे.

त्या भागात एक प्रचंड स्तूप आहे. त्याची उंची २७' व व्यास १५.५' असून, त्याच्या दर्शनी भागावर भव्य बुद्धमूर्ती सिंहासनावर विराजमान झालेली आहे. स्तूपाच्या वरच्या भागात बोधिवृक्षाचे तोरण व गंधर्वांच्या आकृती कोरलेल्या आहेत. बिहारमधील बुद्ध गयेच्या महाबोधी मंदिराच्या पश्चिमेला जो पिंपळ आहे तोच बोधिवृक्ष. इथेच गौतम बुद्ध म्हणजे सिद्धार्थ ह्यांना संबोधी प्राप्त झाली.

कोनाड्याच्या वर नाग व नागदेवी यांच्या आकृती कोरलेल्या असून, अंतरिक्षात संचार करणारे गंधर्व आपल्या भार्यांसह बुद्धांना वंदन करीत असलेले दाखवले आहेत. खाली कोनाड्यात अवलोकितेश्वर, वज्रपाणी व तारा यांच्या मूर्ती आहेत. कठड्यावर नृत्यमूर्ती कोरलेल्या आहेत.




**लेणी क्र. ११** - हे लेणे दोनताल या नावाने ओळखले जात होते. हे तीनमजली लेणे ठरले आहे. जवळच अवलोकितेश्वराची अलंकारयुक्त मूर्ती व दोन्ही बाजूंना तारा व भृकुटी यांच्या मूर्ती आहेत. भृकुटी ही बौद्धांची एक प्रमुख देवता होय. वरच्या बाजूला लहान लहान बुद्धमूर्ती व गंधर्वांच्या प्रतिमा आहेत. दुसऱ्या दरवाज्यातून आत गेले, की बुद्धांची प्रचंड मूर्ती भूमिस्पर्श मुद्रेत व ध्यानासनात सिंहासनारूढ अशी दिसते.

**लेणी क्र. १२** - हे तीनताल या नावाने ओळखले जाते. कारण त्यात तीन मजले आहेत. हे चैत्यगृह आणि विहार असे संमिश्र स्वरूपाचे लेणे असून, वेरूळच्या बौद्ध लेण्यांत सर्वांत मोठे आहे. अंतराळातील भिंतीवर एका बाजूला एक मूर्तिपट आहे. त्यात नऊ चौकोन आहेत. मधल्या चौकोनात बुद्ध व चौरीधारक, डाव्या व उजव्या अंगी पद्मपाणी व वज्रपाणी आणि खाली व वर ६ चौकोनांत विविध मूर्ती कोरलेल्या दिसतात.




गर्भगृहात ध्यानस्थ बुद्धांची प्रचंड मूर्ती असून, दोन्ही बाजूंच्या भिंतींवर उंच जागी पाच ध्यानस्थ बुद्ध आणि खाली चार बोधिसत्त्व अशा प्रतिमा कोरलेल्या दिसतात.

**लेणी क्र. १४** - रावण की खाई या नावाने हे प्रसिद्ध आहे. कारण, त्यात कैलासपर्वत हालविणाऱ्या रावणाचे शिल्प कोरलेले आहे. उत्तरेकडील भिंतीत पहिल्या खणात दुर्गादेवी हातात त्रिशूळ घेऊन व सिंहावर पाय ठेवून उभी आहे. दुसऱ्या खणात उत्फुल्ल कमलावर लक्ष्मी, बाजूला शंखचक्रधारी चतुर्भुज सेवक कुंभ घेऊन उभे व मस्तकी जलसिंचन करणारे दोन दोन हत्ती दोन्ही बाजूंना असे शिल्प आहे. तिसऱ्या खणात वराहरूपी विष्णूने स्त्रीरूपी पृथ्वीला सागरातून वर उचलले आहे, असे दृश्य दिसते. पुढच्या खणात श्रीदेवी व भूदेवी यांच्यासह विष्णूची मूर्ती आहे. खणात विष्णू-लक्ष्मी यांची प्रतिमा मकरतोरणाखाली कोरलेली आहे. खालच्या बाजूला निरनिराळी वाद्ये घेतलेले सेवक आहेत.

त्यानंतर गाभारा लागतो. द्वाराजवळ, एका बाजूला मकरावर गंगादेवी व कूर्मावर यमुनादेवी उभी दिसते. आणखी काही स्त्रीमूर्ती व सेवक आहेत. गाभाऱ्यात महिषासुरमर्दिनीची मूर्ती एका चबुतऱ्यावर उभी आहे. महिषासुरमर्दिनी हे देवीचे एक रूप आहे. या रुपात तिने महिषासुराला मारले म्हणून तिचे नाव महिषासुरमर्दिनी होय. तिची मंदिरे अनेक ठिकाणी उभारलेली आहेत. बाजूला भिंतीत उजव्या हाताला वीरभद्राची प्रतिमा आहे. वीरभद्र म्हणजे शिवगणांचा सेनापती, तो असुरांचा संहारक आणि देवांचा संरक्षक आहे. त्यानंतर हंसारुढ ब्राह्मी, नंदीवाहना माहेश्वरी, मयूरवाहना कौमारी, गरुडवाहना वैष्णवी, वराहवाहना



Scanned with OKEN Scanner

वाराही, गजवाहना इंद्राणी व घुबडवाहना चामुंडा या सप्तमातृकांच्या मूर्ती आहेत. प्रत्येकीजवळ एक लहान बालक आहे. सप्तमातृका म्हणजे रक्षक अशा लोकमाता.



कैलास पर्वतावर शिवपार्वती बसले आहेत. रावण आपल्या सर्व हातांनी तो पर्यंत उचलण्याचा प्रयत्न करीत आहे. पार्वती भयभीत झाली आहे, पण शिव शांत आहे. रावणाने आपली सर्व शक्ती एकवटून पर्वत उचलण्यासाठी पवित्रा घेतला आहे, हे स्पष्ट दिसते.
अशा मूर्ती आपल्याला घारापुरी, वेरुळ, भुवनेश्वर इ. ठिकाणी आढळतात.


**लेणी क्र. १५** - हे दशावतार लेणे या नावाने प्रसिद्ध आहे. भिंतीत २' उंचीचे ११ कोनाडे आहेत. त्यांत गणपती, शिवपार्वती, सूर्य, शिवपार्वती-गणपती-नदी, महिषासुरमर्दिनी, अर्धनारीश्वर, भवानी, गणेश, उमा व काली यांच्या सुबक मूर्ती दिसतात. दुसऱ्या मजल्यावरील दालनात ४४ स्तंभ आहेत. त्यानंतर गाभारा लागतो. त्यात एक भग्न शिवलिंग आहे. दालनाच्या दोन्ही बाजूच्या भिंतीत शैव आणि वैष्णव शिल्पपट कोरलेले आहेत. भिंतीत पहिला पट अंधकासुरमर्दनाचा आहे. त्यातील अष्टभुज शिवाचे रूप अत्यंत भीषण दिसते. जवळच कालीचीही भयानक मूर्ती आहे. पार्वतीची मूर्ती मात्र सौम्य असून, ती विस्मित दृष्टीने शिवाचे रौद्र रूप पाहत आहे. दुसऱ्या खणात तांडवनृत्य करणाऱ्या शिवाची प्रतिमा आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner





गर्भगृहासमोर नंदीची एक सुटी मूर्ती आहे. प्रांगणात दक्षिण बाजूला एक मोठे पाण्याचे टाके आहे. गर्भगृहात शिवलिंग व त्यामागे त्रिमुख महेशमूर्ती उठावाने कोरलेली दिसते.

**लेणी क्र.** १६ - हे लेणे कैलास या नावाने जगद्विख्यात आहे. हे शिवमंदिर इ. स. च्या ८ व्या शतकात राष्ट्रकूट राजा कृष्ण (पहिला) याच्या राजवटीत खोदलेले आहे. गिरिशिल्पांत हे अद्वितीय आहे. याचे अद्‌भुत शिल्पसौंदर्य पाहणाऱ्याला विस्मित करते. भक्ती, श्रद्धा, दिव्यत्व आणि भव्यत्व या सर्वांचे ते प्रतीकच वाटते.

हे संपूर्ण एकाच खडकात खोदलेले असले तरी, डोंगरापासून वेगळे केलेले आहे. भिंतीत दिक्पाल, शिव, विष्णु, इंद्र-इंद्राणी, महिषासुरमर्दिनी, नृसिंह, वराह, त्रिविक्रम, ब्रह्मा, इ. देवतांची भव्य शिल्पे आहेत. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना गंगा व यमुना यांच्या मूर्ती कोरलेल्या असून, खालच्या भागात हत्ती, सिंह वगैरे पशुंच्या रांगा दिसतात.

**लेणी क्र. १७** - बाजूच्या शिल्पपटात कमलाधिष्ठित ब्रह्मा व समोरच्या बाजूला विष्णूची मूर्ती आहे.

**लेणी क्र. १९** - लेण्याच्या दर्शनी भागात उत्तरेला कुबेराची मूर्ती आहे. ती बौद्ध लेण्यातील जंभलासारखीच दिसते. हे मुळचे बौद्ध लेणे असावे.

**लेणी क्र. २०** - चौथऱ्याच्या मध्य भागावर अनेक शिवगणांच्या आकृती कोरलेल्या आहेत. लेण्याच्या प्रांगणात गेल्यावर नंदीचा चबुतरा मध्यभागी दिसतो. प्रांगणाच्या बाजूच्या भिंतीत उजव्या बाजूला महिषासुरमर्दिनीची व डाव्या बाजूला गणपतीची मूर्ती दिसते.



Scanned with OKEN Scanner

लेणी क्र. २१ - हे रामेश्वर या नावाने प्रसिद्ध आहे. उंच चौथऱ्यावर नंदी असून, प्रांगणाच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीत द्विस्तंभाधारित मंडपात गणेशमूर्ती व कार्तिकेयाची मूर्ती आहे. कार्तिकेय हा शिव आणि पार्वती यांचा पुत्र, षण्मुख, षडानन, सुब्रह्मण्य, कुमार, स्कंद ही त्याचीच नावे होत.



सभामंडपाच्या दोन्ही बाजूंना सुंदर शिल्पपट आहेत. उत्तरेकडील दालनात समोरील भिंतीवर तीन भागांत शिव-पार्वती विवाहाची कथा साकार केलेली आहे. बाजूच्या भिंतीवर महिषासुरमर्दिनी व कार्तिकेय यांचे शिल्पपट आहेत.



लेणी क्र. २२ - याला नीळकंठ लेणे असे म्हणतात. अंतरालामध्ये बाजूच्या भिंतीत गणेश व कार्तिकेय यांच्या मूर्ती समोरासमोर असून, मागच्या भिंतीत गजलक्ष्मी व दुसरी एक देवी आहे. गर्भगृहात शाळुंका व शिवलिंग आहे. त्या लिंगावर निळ्या रेघा असल्यामुळे त्याला नीळकंठ हे नाव देण्यात आले आहे. गजलक्ष्मी हे लक्ष्मीचे एक रूप आहे. लक्ष्मी कमळावर बसलेली किंवा उभी असते. तिच्या हातात एक



Scanned with OKEN Scanner

कमळ आणि सभोवतीअनेक प्रफुल्ल कमळे आणि दोन्ही बाजूंना आपल्या सोंडेने तिच्यावर जलवृष्टी करणारे दोन हत्ती असतात.

**लेणी क्र. २४** - उरलेल्या शाळुंका तेलाच्या घाणीसारख्या दिसतात. म्हणून लेण्याला तेली का घाना म्हणतात. यात गणपती व शिव यांच्या लहान मूर्ती आहेत.

**लेणी क्र. २५** - याला कुंभारवाडा म्हणतात. गाभाऱ्याजवळच्या छतावर रथारूढ सूर्यप्रतिमा उठावाने कोरलेली आहे. गर्भगृहाच्या दोन्ही बाजूंना खड्गधारी द्वारपाल आहेत.

**लेणी क्र. २७** - हे लेणे एका घळीच्या काठावर असून, त्याच्यावरून एक जलप्रपात कोसळत असतो. याला गौळणगुंफा म्हणतात. दरवाज्याच्या उजव्या बाजूला बलराम, सुभद्रा व कृष्ण यांच्या मूर्ती आहेत. बाजूच्या भिंतीत शेषशायी नारायणाची ओबड-धोबड प्रतिमा आहे. बाजूच्या भिंतीत पृथ्वीचा उद्धार करणारा वराह आहे. खिडक्यांमध्ये महिषासुरमर्दिनीचे शिल्प आहे.

**लेणी क्र. २८** - ज्या कड्यावरून जलप्रवाह खाली कोसळतो, त्याच्या खाली हे लहानसे लेणे आहे. याच्या प्रवेशद्वाराच्या बाजूंना गंगा व यमुना यांची शिल्पे होती. पण ती नष्ट झाली आहेत.

**लेणी क्र. २९** - सीता की नहानी या नावाने हे लेणे प्रसिद्ध आहे. अग्रमंडपाच्या चौथऱ्यावर दोन भव्य सिंह आहेत. अग्रमंडपात उजव्या बाजूच्या भिंतीवर अंधकासुरवधाचा शिल्पपट आहे. शिव-पार्वती-विवाहाचा प्रसंग प्रेक्षणीय आहे. या बाजूच्या प्रांगणात सरस्वतीची मूर्ती आहे. समोरच्या भिंतीत शिव-पार्वती-खेळताना दिसतात.

**लेणी क्र. १३ ते २९** - या लेण्यांना ब्राह्मणी किंवा वैदिक लेणी म्हणतात. इथून पुढे जैनांची लेणी लागतात. वेरूळ येथील जैनांची ही लेणी दिगंबरपथी असून, त्यांत गोमटेश्वराची प्रतिमा वारंवार कोरलेली दिसते. या लेण्यांतील तीर्थंकरांच्या मूर्ती शिल्पकलेच्या दृष्टीने महत्त्वाच्या नाहीत. गोमटेश्वर म्हणजे बाहुबली. ज्यांचे सर्व दोष नाहीसे झालेले आहेत नि तीर्थ म्हणजे धर्म, त्या धर्माचे प्रकटीकरण करणारे! त्यांची संख्या २४ आहे.



लेणी क्र. ३० - हे छोटा कैलास या नावाने प्रसिद्ध आहे, कारण त्याची रचना कैलास लेण्यासारखीच आहे. त्याचे आकारमान मात्र लहान आहे. डोंगरापासून वेगळे खोदून काढलेले आहे. गर्भगृहात महावीरांची मुख्य मूर्ती असून, बाजूच्या भिंतीत इतर तीर्थंकरांच्या प्रतिमा आहेत. सभामंडपांच्या बाजूला भिंतीत पार्श्वनाथ आदी तीर्थंकरांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. गाभाऱ्याच्या दोन्ही बाजूंना आणि वर उपमंदिरे असून, त्यांतही तीर्थंकरांच्या विविध आसनांतील मूर्ती आहेत.अग्रमंडपाच्या दोहो बाजूंना यक्षाच्या नृत्यमूर्ती आहेत.

गोपुराच्या दक्षिणेकडील भिंतीत ऋषभनाथाची यक्षिणी चक्रेश्वरी हिची प्रतिमा आहे. खाली वाहन म्हणून गरुडाची आकृती कोरलेली दिसते.



लेणी क्र. ३१ - गोमटेश्वराची कायोत्सर्ग मूर्ती व तिच्या समोर पार्श्वनाथाची कायोत्सर्ग मूर्ती आहे. गर्भगृहात ध्यानमुद्रेतील महावीरांची मूर्ती असून, वर चामरधारी सेवक आहेत.







Scanned with OKEN Scanner


लेणी क्र. ३२ - लेण्यांचा एक समूह आहे. मुख्य लेण्याला इंद्रसभा म्हणतात. प्रांगणात उजव्या बाजूला एका चबुतऱ्यावर मोठा हत्ती व डाव्या बाजूला एक स्तंभ आहे. या स्तंभाचा उंची २७' आहे.



लेणी क्र. ३३ - याला जगन्नाथसभा म्हणतात. दोन्ही बाजूंना इंद्र व इंद्राणी यांच्या उत्कृष्ट मूर्ती आहेत. त्यांतील वृक्षावरील पाने, फळे, पक्षी व इतर नक्षी अत्यंत सुरेख आहे. आतील गाभाऱ्यात महावीरांची प्रतिमा आहे. यालाच जगन्नाथ समजून या लेण्याला जगन्नाथसभा हे नाव दिले गेले आहे. या लेण्यात भित्तिचित्रांचे अवशेष दिसतात.

लेणी क्र. ३२ च्या जवळ अलीकडेच केलेल्या उत्खननात एक मंदिर सापडले आहे. त्यात महानुभाव पंथाचे प्रमुख आचार्य चक्रधर यांची पद्मासनातली मूर्ती असून, ती थोडीशी खराब झालेली आहे. चक्रधर हे महानुभाव पंथाचे संस्थापक. भारतातील तीन श्रेष्ठ धर्मपंथी महाराष्ट्रातील महनीय आणि असमान्य अश्या पाषाण गुंफांमधील वास्तुशास्त्रीय आणि शिल्पकलात्मक कामगिरीचा पूर्ण विराम म्हणजे वेरूळची लेणी या कामगिरीला उभ्या भारतात तोड नाही असे श्री. कार्ल खंडाळवाला म्हणतात.








Scanned with OKEN Scanner

# ३. घारापुरी लेणी / एलिफंटा लेणी



घारापुरी लेणी ही मुंबईजवळची अत्यंत प्रख्यात जगप्रसिद्ध लेणी आहेत. एलीफंटा लेणी घारापुरी या नावानेही ओळखल्या जातात. या ठिकाणी पूर्वी महाकाय दगडी हत्तीची मूर्ती होती. तिला पाहून पोर्तुगीजांनी या लेण्यांना Elephanta Caves हे नाव दिले. एलिफंटा घारापुरी लेणी इसवी सन सहाव्या शतकामध्ये खोदल्या गेल्या असाव्यात असे तज्ञांचे मत आहे. येथील लेणी वाकाटक आणि कलचुरी घराण्यातील राजांनी खोदलेल्या आहेत. तर काही तज्ञांच्या मते ही लेणी चालुक्य आणि राष्ट्रकूट राजांनी खोदलेल्या आहेत.एलीफंटा लेणी शैव पंथातील पाशुपत संप्रदायाला समर्पित आहेत.

एलिफंटा लेणी पाशुपत स्थापत्य शैलीचा उत्कृष्ट आविष्कार आहेत. या लेण्यांमध्ये प्रामुख्याने शिवाच्या विविध अवतारातील अद्वितीय प्रतिमा आहेत. तसेच रामायण ,महाभारत यातील प्रसंगावर आधारित शिल्पकाम देखील या लेण्यांमध्ये पाहावयास मिळते.



Scanned with OKEN Scanner



*** सध्या हत्तीची मूर्ती मुंबईतील भाऊ दाजी लाड संग्रहालयात ठेवलेली आहे. ***

येथे पूर्वी एक प्रचंड महाय दगडी हत्ती होता. ही हत्तीप्रतिमा सव्वासात फूट आणि सव्वातेरा फूट लांब होती. यावरूनच पोर्तुगिजांनी या बेटाला एलिफंटा हे नाव दिले. सध्या हत्तीची मुंबईतील भाऊ दाजी म्यूजात ठेवलेली आहे.


युनेस्को 1987 मध्ये एलिफंटा लेणीने स्थानिक स्वराज्य म्हणून घोषित केले आहे. एलिफंटा गुंफाचे जतन आणि संवर्धन कार्य भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग यांच्याकडून केले जात आहे. एलिफंटा लेणी कोरीव शिल्पकाम आणि आकर्षक लेण्यांसाठी प्रसिद्ध आहे. एलिफंटा घारापुरी लेणी केव्हा खोदल्या गेल्या लिहित पुरावे प्रश्न आहेत. यावी सन सहाव्या कॉलनी एलीफं लेणी खोदल्या गेल्या असाव्यात असे विशेषज्ञांचे मत आहे. येथील लेणी वाकाटक आणि कलचुरी घराण्यातील राजे खोदलेल्या आहेत. तर काही तज्ञांच्या मते ही लेणी चालुकल्या आणि राष्ट्रकूटांनी खोदलेल्या आहेत.



*त्रिमूर्ती शिव*

त्रिमूर्ती शिव- एलिफंक्शन लेणी येथील क्रमांक एकचे लेणे ग्रेट गुंफा ओळखले जाते. याला तीन मुख असून तिन्ही चेहऱ्यावर शांती ,उग्रपणा आणि प्रेम या भावना शोधून काढलेले हे शिल्प अद्वितीय बनले आहे. महाराष्ट्र महा महानगर शिवाच्या लोकांसाठी येथील त्रिमूर्तीची प्रतिमा आहे .

कल्याणसुंदरमूर्ती शिव – एलिफंटा घारापुरी लेणी येथील उत्कृष्ट कल्याणमूर्ती सुंदरी केंद्रे आहेत. याशिवाय लकुलीषाची तपश्चर्या, पार्वती बरोबर द्युत गुंड, रावणुग्रह, अर्धनारी शिव, वर गंगा धारण धारण गंगाधर शिव, गजासुर आणि अंधकासुर या दोन शंकेचे वध पूर्ण शिव पाहणारे भव्य शिल्पपट एलिफंटा गुंफेमध्ये आश्चर्याचे स्थान आहेत.





Scanned with OKEN Scanner

एलिफंटा लेण्यांचे स्थान :   प्रेक्षणीय स्थापत्य आणि शिल्पकला एलिफंटा लेणी पाशुपत स्थापत्य
लांचे उत्कृष्ट आविष्कार आहेत. या लेण्यांमध्ये शिवाच्या विविध अवतारातील अद्वितीय प्रतिमा आहेत.
संच रामायण ,महाभारतातील प्रसंगावर आधारित शिल्पकाम देखील लेण्यांमध्ये पाहावयास या
ढळतात. पूर्व पश्चिम आणि उत्तर अशा तीन बाजूला या लेण्यांना आहेत. उत्तरेले प्रवेश मंडप हेच मुख्य
शद्वार आहे. या ठिकाणी एकूण सात लेणी आहेत. चिन्हे एक ते पाच किंवा हिंदू लेणी आहेत तर सहा
णि सात बौद्ध लेणी आहेत.घारापुरी येथील बेटेवर तीन गावे असून सुमारे दोन हजार लोक वस्ती
हेत.




*कल्याणसुंदरमूर्ती शिव*


कल्याणसुंदरमूर्ती शिव - एलिफंटा येथील वैशिष्ट्यपूर्ण शिवप्रतिमेतील शिवपार्वतीच्या लग्नाचे
य दर्शविणारी एक भव्य शिल्प, या मूर्तीला प्रतिमाशास्त्रात कल्याणसुंदरमूर्ती असे म्हणतात. याशिवाय,
कैलिशाची तपश्चर्या, पार्वतीसोबतचे दैवताचे खेळ, रावण अनुगृह, अर्धनारी शिव, गंगाधर शिवाने
ज्यावर गंगा धरलेली, गजासुर आणि अंधकासुर या दोन राक्षसांचा वध करतानाचे शिव हे एलिफंटा
ण्यांमधील पर्यटन आकर्षणे आहेत.
ा क्रमांक ६ आणि ७ गुहा क्रमांक ६ ही चैत्य विहार असावी. समोर एक भव्य मंडप आणि मागच्या
तीत तीन तीर्थक्षेत्रे आहेत. तीन तीर्थक्षेत्रांपैकी एक पोर्तुगीजांनी चर्च म्हणून वापरला होता. गुहा क्रमांक
हा सीताबाईंचे मंदिर म्हणून ओळखला जातो. गुहा क्रमांक ७ ही अतिशय जीर्ण झाली आहे. पोर्तुगीज
न्य या ठिकाणी लष्करी सराव करत असताना अनेक शिल्पे आणि मूर्ती नष्ट झाल्या आहेत.



Scanned with OKEN Scanner

लिफंटा लेणी पाशुपत स्थापत्य शैलीचा उत्कृष्ट आविष्कार आहेत. एलिफंटा लेणी देशभरातील र्यटकांसाठी आकर्षणाचे केंद्र आहेत.एलिफंटा घारापुरी लेणी हे एकाच ठिकाणी सांस्कृतिक पर्यटन, समुद्र र्यटन आणि निसर्ग पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी एक आदर्श ठिकाण आहे. लिफंटा घारापुरी लेणी इसवी सन सहाव्या शतकामध्ये खोदल्या गेल्या असाव्यात असे तज्ञांचे मत आहे. थील लेणी वाकाटक आणि कलचुरी घराण्यातील राजांनी खोदलेल्या आहेत. तर काही तज्ञांच्या मते ही णी चालुक्य आणि राष्ट्रकूट राजांनी खोदलेल्या आहेत.एलीफंटा लेणी शैव पंथातील पाशुपत प्रदायाला सर्मपित आहेत.


एलिफंटा लेणी पाशुपत स्थापत्य शैलीचा उत्कृष्ट आविष्कार आहेत.







Scanned with OKEN Scanner

# ४. कान्हेरी लेणी




मुंबई महानगरीतील बोरिवलीच्या राष्ट्रीय उद्यानालगत ही प्रख्यात लेणी आहेत. बोरीवलीपासून
पूर्वेला सुमारे १० किमी अंतरावर १०२ गुहांच्या समूहालाच कान्हेरी लेणी म्हणतात. तुळशी तलाव, विहार
तलाव, सिंधुसागर आणि कृष्णगिरी वा कृष्णशैल हा डोंगर या परिसरात ही लेणी शोभून दिसतात.
कृष्णगिरीचा अपभ्रंश कान्हेरी पूर्वी येथे एक बौद्ध मठ असावा. तिथली चैत्य लेणी गौतमीपुत्र सातकर्णी (इ.
स. १०६ ते १३०) याच्या वाळात कोरली गेली. सभागृह, विहार, असंख्य लहान खोल्यांच्या रांगा, दागोबा,
स्तंभ, भगवान बुद्ध नि श्री अवलोकितेश्वराच्या प्रचंड मूर्ती, छत्री, पाण्याची टाकी हे सारे पाहण्यासाठी
आहे. हीनयान, महामान दोन्ही पंथांची लेणी इथे आहेत.









Scanned with OKEN Scanner





शिलालेखांवरून समजते की ही लेणी महाराष्ट्रातील राजे, महारठी, महाभोज, श्रेष्ठी, गृहपती, मणिकार, सुवर्णकार यांच्या प्रेरणेनेच बांधलेली आहेत. क्र. १० आणि ७८ या लेण्यांतील लेख संस्कृत भाषेत असून शेष लेख प्राकृतात आहेत. काही लेखांत राजांची नावे व त्यांचा काल वहीत नुसतीच राजांची नावे आहेत. लेणे क्र. ३ हे चैत्य लेणे कार्ले येथील चैत्यगृहासारखे दिसते. त्यातच भगवान श्री बुद्धांची महाकाय प्रतिमा कोरलेली आहे अवश्य दर्शन घ्यावेच. ३५ व्या लेण्यात पद्मपाणी तारादेवी आणि बोधिसत्त्व यांच्या सुंदर आकृती आहेत. गुहा क्र. ७८ मधील लेखावरून कळते की ते लेणे राष्ट्रकूट वंशातील अमोघवर्ष पहिला (इ. स. ८१४-८८०) याच्या राजवटीत खोदले गेले. प्रत्येक गुहेत पाण्याचे टाके आहे नि डोंगराच्या माथ्यावरून पाणी येण्यासाठी पन्हाळ खोदलेली आहे. कोकणचे शिलाहार राजे येथील बौद्ध मठास दान देत होते. इ. स.च्या ९ व्या शतकात इथे बौद्ध विद्यालय नि ग्रंथालय होते.



# ५. नाणेघाटाची लेणी



नाणेघाटातील लेणी ही महाराष्ट्रातील अतिशय वैशिष्ट्यपूर्ण लेणी होत. णेघाट हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक प्राचीन व्यापारी घाट मार्ग आहे. हा मार्ग पूर्वीचे र्णनगर(जुन्नर) व कोकणातील भाग यांना जोडतो. हा घाटमार्ग सातवाहन-कालीन आहे. व्यापारासाठी यांचे व्हावे यासाठीच देश(सह्याद्रीच्या पूर्वेकडील महाराष्ट्र) व कोकणाला जोडत हा घाट खोदण्यात ला. इसवी सन पूर्व पहिल्या शतकात हे खोदकाम झाले. या मार्गाचे एक टोक वर जुन्नरच्या दिशेला, तर रे खाली कोकणात मुरबाड तालुक्यात आहे.

मौर्य राजांनंतर सत्तेत आलेल्या सातवाहन राजांनी हा घाट खोदला. या घाटात सातवाहनांनी एक ण तयार करत त्यामध्ये त्यांच्या कुलाची गाथाही कोरून ठेवलेली आढळते. येथे असलेल्या लेखात तवाहन सम्राज्ञी 'नागणिके'विषयी माहिती मिळते. या लेखांमध्ये महाराष्ट्राच्या आद्य राज्यकुल, त्यांचा राक्रम, दानधर्माबद्दल माहिती आहे. इसवी सन पूर्व पहिल्या शतकात भारताच्या मोठया भूप्रदेशावर राज्य रणारा सातवाहन हे पहिले राजे होते. हा राजवंश सुमारे चार शतके सलग राज्य करत होता. या काळात यांचे तीस पराक्रमी राजे होऊन गेले. या सातवाहनांच्या राजवटीत महाराष्ट्र इतर प्रदेशात सुवर्णकाळ होता से मानले जाते. प्रतिष्ठान (पैठण), जीर्णनगर (जुन्नर), तगर (तेर), नेवासे, नाशिक अशी भरभराटीला आलेली शहरे या राजवटीत उदयास आली. अशा या सातवाहनांच्या राज्यात प्रवेश करण्यासाठी 'नाणेघाट' हा प्रमुख मार्ग होता.




Scanned with OKEN Scanner






येथील एका लेखात सातवाहनांच्या पराक्रमाशिवाय त्यांनी इथे केलेले यज्ञ, दानधर्माचे उल्लेख आहेत. सातवाहन राजांनी दोनदा अश्वमेध यज्ञ केला असे दिसून येते. याशिवाय वाजपेय यज्ञ, राजसूय यज्ञ असे तब्बल २२ यज्ञ इथे पार पडल्याची माहिती हे लेख देतात. हजारो गाई, शेकडो हत्ती, घोडे, खेडी, धान्य, वस्त्र-अलंकार आणि तत्कालीन सातवाहनांची कार्षापण या नाण्यांचा मोठा दानधर्म केल्याचाही यात उल्लेख येतो.






- येथील गुहांमध्ये ब्राम्ही भाषेतील लेख आढळतात. गुहांमध्ये सातवाहनांचे वंशजांचे पुतळे आहेत. त्यांचे सध्या पायांचे भाग आहेत.
- सुपारक अर्थात सोपारा आणि कल्याण ही प्राचीन काळी पश्चिम किनाऱ्यावरची दोन अत्यंत महत्त्वाची व्यापारी केंद्रे होती. केवळ देशांतर्गतच नव्हे, तर परदेशातील व्यापाराला सुद्धा येथून मोठी चालना मिळत असे. विशेषतः रोमहून आयात होणारा माल सोपाऱ्याला उतरवला जाऊन तेथून कल्याण, नाणेघाट, जुन्नर, नेवासा मार्गे पैठणकडे नेला जात असे. तसेच निर्यातीच्या वस्तूंची वाहतूक देखील याच मार्गावरून उलट दिशेने होत असे.

नाणेघाटातील लेणी म्हणजे महाराष्ट्रातील ऐहिक स्थापत्यकलेचा एक नमुना आहे. आणि खुद नाणेघाट हा सातवाहन नृपतींनी घडवलेले सार्वजनिक स्थापत्याचे पहिले उदाहरण आहे.

# ६. पितळखोरे लेणी



पितळखोरे लेणी पितळखोरे हे ठिकाण औरंगाबाद जिल्ह्यात कन्नड या गावाच्या पश्चिमेस सुमारे २४ किलोमीटर आणि चाळीसगावच्या दक्षिणेस १९ किलोमीटर अंतरावर आहे. येथे बैतलबारी नावाचा किल्ला आहे. २६ व २४ फूट आकाराचा नि आठ स्तंभांनी आधार दिलेला विहार आहे. बैतलबारीच्या पूर्वेस ३ कि. मी. वर गणेशखोरे नावाची दरी आहे. येथील गुंफा रुद्रशिव महादेवाला समर्पिलेली आहे. प्रवेशद्वार काहीसे बांधलेले आहे. काहीसे बोगद्यातून आहे. पाच फूट उंचीचे दोन द्वारपाल येथे दिसतात. आत शिवलिंग आणि नंदी तसेच खडकात कोरलेल्या गणेश, वीरभद्र आणि नृसिंह यांच्या मूर्ती दिसतात.






या लेण्यातील काही गुहा दुमजली आहेत व वर जाण्यास भुयारातून पायऱ्या खोदलेल्या आहेत. मुख्य गुंफा म्हणजे एक मोठा चैत्य आहे. मधल्या भागात ३५ स्तंभ असून या स्तंभांवर धवल, कृष्ण, रक्त आणि तपकिरी वा पिंगट रंगात रंगवलेली बौद्ध संन्यास्याची चित्रे आहेत.





भोवतालच्या दालनातील छतावर सिंहासनाधिष्ठीत आणि वर छत्र असलेल्या बुद्ध मूर्तींनी चितारलेले, सजवलेले आहे. मुंडन केलली मुले व बुटक्या मूर्ती गुढघे टेकून वंदन करताना दिसतात. स्त्री-पुरुष यांच्या आकृतीही येथे दिसतात. (या चित्रांचा काल गुहेपेक्षा अर्वाचीन दिसतो.) चैत्य लेणे क्र.३ आणि विहार लेणे क्र. ४ यांच्या दर्शनीय भागात गन्धिक कुलातील मितदेव आणि पैठणच्या संघकपुत्र यांचे दानलेख आहेत. विहार लेणे क्र. ४ येथील गजथर हा प्राचीन भारतीय वास्तू शिल्पातील चौथऱ्यावर दाखविलेला पहिला गजथर आहे. हे हत्ती अलंकार युक्त असून त्यांच्या दोन्ही बाजूना घंटा लोंबताना दिसतात. या लेण्याच्या प्रवेश द्वारावरील द्वारपाल लक्षणीय आहेत. या लेण्यातील एक अप्रतिम शिल्प म्हणजे राजा-राणी शिल्प होय. या राजदंपतीने भारतीय शिल्पकला क्षेत्रात एक आगळे-वेगळेच महत्त्व प्राप्त करून घेतले आहे.



# ७. अंकाई लेणी




अंकाई-टंकाई हे जोडकिल्ले आहेत. नाशिक जिल्ह्यात अत्यंत मजबूत गड म्हणून हा गड
ओळखला जातो. गडाला अंकाई गावामधूनच रस्ता जातो. मार्गात अलंकृत लेणी आहेत. सात जैन गुंफा
आहेत. तेथील खोदकाम अप्रतिम आहे. मध्यभागी पद्मासनस्थ जैनमूर्ती आहे. दरवाजावर देवाची नक्षी
आहे. आत वेदींचे स्थान आहे. आसन रिकामे आहे. बाहेर पाण्याचे कुंड आहे. गृहा क्र. १ दुमजली आहे.
खांबाखाली द्वारपाल उभे केलेले आहेत. गुहा क्र. २ सुद्धा दुमजली आहे. खालच्या मजल्यात अंगण २६'
१२' आकाराचे आहे. हत्तीवरील इंद्र-इंद्राणी येथे आहेत. मागे एक खोली (२५ चौरस फूट) तीतच वेदीची
खोली (१३ चौरस फूट) आहे. दरवाजावर एक लहानशी जैन तीर्थंकराची कोरीव मूर्ती आहे. येथे एका
मूर्तीचे आसन आहे. वरच्या मजल्यावर २० चौरस फुटांची खोली आहे. आत चार खांब आहेत. आत मूर्ती
नाही, मूर्तीचे आसन आहे.


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner







शेष गुंफा रिकामी आहे. गुंफा क्र. ३ - गुंफेपुढील खोली २५ फूट ९ फूट आकाराची आहे. येथे इंद्र-
इंद्राणी आहेत. मागील भिंतीवर दिगंबर जैन मूर्ती आहेत. उजवीकडे श्रीशांतिनाथ भगवंतांची मूर्ती आहे.
मृगचिन्ह आहे. बाजूला पार्श्वनाथभगवंताची मूर्ती आहे. ही गुंफा १२ व्या वा १३ व्या शतकातली आहे.
गुंफा क्र. ४ - या गुहेच्या पटांगणासमोर दोन मोठे चौकोनी खांब आहेत. प्रत्येक खांब आहे तीस फूट
उंचीचा. खोली आहे १८ फूट २४ फूट आकाराची. डाव्या खांबावर एक लेख आहे, पण तो आता वाचता
येत नाही. मात्र लिपीवरून काळ ठरविता येईल. १२ वे वा १३ वे शतक. याव्यतिरिक्त येथे दोन मंदिरे
दिसतात. दरवाज्यावर कोरीव असे पद्मासनस्थ तीर्थंकर दिसतात. येथील रमणीयता वैशिष्टपूर्ण आहे.
पाचव्या गुहेमधील दालनात दोन मूर्ती आहेत. एक खंडित आहे. आत वेदीवर पद्मासनस्थ दिगंबर जैनमूर्ती,
अडीच फूट उंचीची अखंडित नि सुंदर आहे. बाजूला पद्मासनस्थ मूर्ती दीड हाताची आहे. पण वेदी रिकामी
आहे.



Scanned with OKEN Scanner

सहाव्या गुंफेतील येथील दालनात पाच मूर्तींचा समूह आहे. याच्या मध्यभागी एक हात उंचीची दिगंबर जैनमूर्ती आहे. तोवरील लेख 'सिल प्रगल प्रठामति नित्य' असा आहे. दरवाज्यावर प्रतिमा आहे. जवळच कित्येक खंडित प्रतिमा आहेत. पार्श्वनाथांची मूर्ती नऊ हात उंचीची आहे. गुंफा क्रमांक ७ नि ८ या रिकाम्या आहेत. खाली पंचवीस पायऱ्या उतरल्या की ९ आणि १० या गुंफा लागतात. यांचे शिल्प फार श्रेष्ठ दर्जाचे आहे. बाहेर पाषाणाचे कुंड आहे. या सर्व गुंफा मोठ्या आहेत. लेणी मागे टाकली की गडावर जाण्यास खडकातून खोदलेल्या पायऱ्या आहेत.





पश्चिम हिंदुस्थानात अशा प्रकारचे शिल्प कोणत्याच लेणीत आढळत नाही ते तेथे आढळते. सिंह हे जैन धर्माचे शेवटचे तीर्थंकर भगवान महावीर यांचे लांछन आहे. तेव्हा हे लेणे भगवान महावीरांसाठी खोदण्यात आले असावे किंवा यात भ. महावीरांची प्रतिमा असावी असे वाटते.



Scanned with OKEN Scanner

# ८. आगाशिव लेणी



कराड शहराच्या नैर्ऋत्येस तेरा किलोमीटर अंतरावर आगाशिव नावाचा डोंगर आहे. त्या डोंगरात चौसष्ट लेणी खोदलेली आहेत. त्या डोंगरावर आगाशिव नावाचे शिवालय आहे. त्यावरूनच लेण्यांना आगाशिव लेणी असे म्हणतात. ती लेणी इसवी सनपूर्व 250 ते 200 या 450 वर्षांच्या कालखंडात टप्प्याटप्प्याने खोदली गेली असावीत. ती लेणी हा कराडचा सांस्कृतिक ठेवा बनून गेला आहे. कराड हे तालुक्याचे ठिकाण असून ते सातारा जिल्ह्यात आहे. आधुनिक कराड हे प्राचीन महाराष्ट्रातील प्रसिद्ध नगर होते. त्या नगराचा उल्लेख भारहूत, जुन्नर, कुडा व इतर लेण्यांतील शिलालेखांतून करहाटक, करहकट किंवा कारहाडक असा आढळतो.









Scanned with OKEN Scanner


लेणी हीनयान पंथीयांची आहेत. ती बौद्ध भिक्षूंच्या वर्षावासासाठी खोदलेली असावीत. ती हीनयान पंथीयांची असल्यामुळे त्यामध्ये अलंकरण व मूर्तिशिल्पे यांचा जवळजवळ अभाव आहे. आगाशिवजवळ जखिणवाडी समूहातील क्रमांक सहाचे चैत्य लेणे वैशिष्ट्यपूर्ण आहे. ते लेणे 10.5 मीटर फूट खोदलेले व चार मीटर रुंद आहे. मुख्य दालनात जाण्यासाठी दरवाज्यावर खिडकी असून ते अर्धवर्तुळाकार व गजपृष्ठाकार आहेत. त्यात स्तंभांचा अभाव दिसतो.





दरवाज्याच्या भिंतीलगत अर्धस्तंभ आहेत. त्यांच्या शीर्षावर उलटा घट व अमलकाची चौकट दिसून येते. त्यावर एका बाजूला सिंह व दुसऱ्या बाजूला धर्मचक्र आहे. जुन्नर येथील स्तूपाप्रमाणे येथील स्तूपाचे छत्र छताला भिडवण्यात आलेले आहे. तेथील एका चैत्य लेण्यात कुडा व कार्ले येथील चैत्यगृहाप्रमाणे दानी युगुलाचे शिल्प दिसून येते. ते बरेचसे झिजलेले आहे. ते शिल्प यक्ष दांपत्याचे असावे. पुरुषाने धोतरवजा अधोवस्त्र परिधान केलेले असून गळ्यात माळा व कानांत अलंकार आहेत. त्याच्या मस्तकावरील पागोटे कार्ले येथील दानी पुरुषाप्रमाणे आहे. स्त्रीमूर्तीच्या हातात करंडकासारखी वस्तू असून ती पुरुषाला अर्पण करताना दाखवण्यात आलेली आहे.

# ९. पन्हाळे - काजी लेणी



रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध ऐतिहासिक स्थळ. दापोलीपासून सु. ३० किमी., तर दापोली-खेड त्यावर वाकवली फाट्यापासून १९ किमी. अंतरावर हे ठिकाण आहे. पन्हाळे गावाच्या दक्षिणेकडील गर-माथ्यावर 'पन्हाळे' नावाचा एक दुर्ग आहे. जवळच झोलाई देवी या ग्रामदेवतेचे मंदिर आहे. लाहारांच्या बाराव्या शतकातील दोन ताम्रपटांत या ठिकाणाला 'प्रणालक' म्हणून संबोधित केल्याचे सते. सतराव्या शतकात विजापूरच्या आदिलशाही काळात येथे नियुक्त केलेल्या एका काजीमुळे पन्हाळे वाबरोबर 'काजी' हा शब्द जोडला गेला. अत्यंत निसर्गरम्य अशा सह्याद्री पर्वतरांगेच्या पायथ्याशी टजाई व धाकटी नदीच्या खोऱ्यात हे स्थळ असून साधारणतः इ. स. तिसऱ्या शतकापासून ते चौदाव्या तकापर्यंत समृद्ध अशा इतिहासाची साक्ष असणाऱ्या एकूण २९ लेणी येथे खोदण्यात आल्या आहेत. पैकी २८ लेणी कोटजाईच्या उजव्या किनाऱ्यावर उत्तराभिमुख असून २९ वे लेणे बागवाडीजवळ 'गौर णे' या नावाने प्रसिद्ध आहे. हीनयान (थेरवाद), वज्रयान, शैव, गाणपत्य व नाथ संप्रदायाचा ठसा या यांवर पडलेला दिसून येतो.





Scanned with OKEN Scanner



**पन्हाळे-काजी येथील लेणीसमूह.**

पन्हाळे-काजी येथील लेण्या सर्वप्रथम दाभोळच्या अण्णासाहेब शिरगावकर यांनी १९७० साली प्रकाशात आणल्या. परंतु त्यापूर्वी जेम्स बर्जेस यांनी या ठिकाणाचा उल्लेख करून येथे काही कोरीव बाक असल्याचे एका वृतांतात नमूद करून ठेवले होते (१८७०). मुळात हा लेणीसमूह काही पूर्ण व काही अर्धी अधिक नदीच्या गाळाने व डोंगरावरून पडलेल्या मलब्यामुळे भरून गेला होता. महाराष्ट्र सरकारच्या पुरातत्त्व खात्याने या लेण्यांतील बहुतांश गाळ व इतर राडा-रोडा काढण्याचे काम केले. त्यानंतर म. न. देशपांडे यांनी या लेण्यांचे सखोल संशोधन केले. शोभना गोखले यांनी प्रकाशात आणलेल्या ११३९ सालच्या विक्रमादित्यच्या ताम्रपटात या स्थानाचा उल्लेख आढळून येतो.





या लेखावरून असे दिसून येते की, शिलाहार राजा प्रथम अपरादित्य (११२७–११४८) याने कदंबांना कोकणातून हुसकावून लावल्यावर आपल्या विक्रमादित्य या प्रिय पुत्रास प्रणालक या राजधानीच्या शहरी दक्षिण कोकणचा अधिपती बनवले. इ. स. सु. तिसऱ्या शतकात हीनयान पंथाच्या भिक्षूंसाठी पन्हाळे-काजी येथे लेणी तयार केली गेली. या लेणी-समूहातील लेणी क्र. ४, ५, ६, ७, ८ व ९ मूलतः सु. तिसऱ्या शतकात खोदल्या गेल्या. लेणी क्र. २, १०, ११, १२, १३ व १८ या साधारणतः चौथ्या-पाचव्या शतकात खोदल्या गेल्या. त्यानंतर साधारणतः दहाव्या शतकात वरील सर्व लेण्यांमध्ये वज्रयानी पंथीयांनी बरेचसे फेरफार केले.

वज्रयानी पंथीयांनी दहाव्या शतकात लेणी क्र. १, ३, १४, १५, १६, १७, १९, २१ व २७ या नव्याने खोदल्या असल्याचे दिसते. पुढे तेराव्या शतकात यातील लेणी क्र. १४, १५, १७, १९ व २१ ब्राह्मण (हिंदू) धर्माच्या प्रभावाखाली आल्या. यातील लेणे क्र. १४ नाथ संप्रदायाच्या ताब्यात आले. ब्राह्मण धर्मीयांसाठी बाराव्या-तेराव्या शतकात लेणी क्र. २०, २२, २३, २४, २५, २६ व २८ या नव्याने खोदल्याचे दिसून येते. यांपैकी लेणे क्र. २२ नंतर चौदाव्या शतकात नाथ संप्रदायाच्या प्रभावाखाली आले, तर लेणे क्र. २९ नाथ-संप्रदायासाठी चौदाव्या शतकात खोदण्यात आले.



लेणी क्र. ४, ५ व ६ मध्ये स्तूप स्थापन केल्याचे आढळून येते. लेणे क्र. ५ मधील पाठीमागच्या भिंतीत गर्भोत्कीर्ण स्तूप आहे. लेणी क्र. ७, ८ व ९ ही मुळात भिक्षुगृहे (विहार) होती. यांतील काही लेण्यांसमोर नंतर वृत्तचितीच्या आकारातील स्तूपही स्थापिले गेले.

महायान पंथीयांसाठी काही बदल केलेले दिसत नाहीत. परंतु आठव्या शतकापासून ते अकराव्या शतकापर्यंत वज्रयान पंथीयांचे वास्तव्य येथे असावे, असे दिसते. याच काळात विशेषतः दहाव्या शतकात येथील लेण्यांत गुप्त तांत्रिक पुजाविधीस उपयुक्त असे फेरफार करून नवीन तांत्रिक देवतांच्या मूर्तींची



Scanned with OKEN Scanner

...स्थापना केल्याचे दिसून येते. मुळातील भिक्षुगृहांच्या पाठीमागच्या भिंतीत कोनाडा व गर्भगृह खोदून त्यामध्ये तांत्रिक मूर्तींची स्थापना केली होती. लेणीत दिसणाऱ्या अष्टकोनी स्तंभात बदल करण्यात आले व दर्शनी स्तंभांच्या स्तंभशीर्षात नागबंध जोडले गेले. मंडपात प्रवेश करण्यासाठी असलेल्या द्वारांवर अलंकृत ललाटबिंब कोरण्यात आली. काही वाढीव खोल्याही नव्याने खोदण्यात आल्या. ईशान्य भारतात लोकप्रिय असणाऱ्या अक्षोभ्य, सिद्धैकवीर या तांत्रिक देवतांची पूजा पन्हाळे-काजी येथे केली जाऊ लागली.

लेणे क्र. १० वज्रयान पंथाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाचे आहे. येथून मिळालेल्या 'महाचंडरोषण' या वज्रयानी देवतेच्या दुर्मीळ मूर्तीमुळे येथील भिक्षूंचा संबंध बंगाल व ओडिशा येथील तांत्रिक केंद्रांशी आला असावा, असे दिसते.

लेणे क्र. १४ मध्ये नाथ संप्रदायाशी संबंधित शिल्पे कोरण्यात आलेली आहेत. या लेण्याच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूस मिळून एकूण १२ शिल्पे आहेत. यातील चौरंगीनाथ तसेच कानिफनाथ व बहुडी योगिनी यांची शिल्पे लगेच ओळखू येतात. गर्भगृहातील शिल्पांपैकी आदिनाथ व मत्स्येंद्रनाथांची शिल्पे ओळखायला सोपी आहेत. या लेण्यात गोरक्षनाथांचे एक खंडित व सुटे शिल्पही मिळालेले आहे. लेणे क्र. १५ मध्ये गणपतीची सुटी मूर्ती स्थापून हे लेणे गाणपत्य संप्रदायाशी जोडले गेले. लेणे क्र. १६ च्या समोर शिलाहारकालीन छोटेसे देवालय असल्याचे दिसते.





लेणी क्र. १८ ते २३ हा लेण्यांचा समूह आहे. यातील १८ वे लेणे वज्रयान पंथी आहे. लेणी क्र. १९ ते २३ मध्ये साधारणतः बाराव्या शतकात भरपूर कामे झाली. अकराव्या शतकात शिलाहार शैलीचे एकाश्म देवालय म्हणून १९ क्रमांकाचे लेणे साकारले गेले. या मंदिराच्या छतावर *रामायण, महाभारत* व कृष्ण-

लेशी संबंधित शिल्पपट कोरण्यात आले. लेणे क्र. २१ मध्ये असलेल्या गणपतीच्या शिल्पावरून या लेण्याला 'गणेश लेणे' म्हणून ओळखले जाते. लेणे क्र. २२ चौदाव्या शतकात नाथ-योग्यांनी वापरायला सुरुवात केले. या लेण्याच्या गर्भगृहात पद्मासनात बसलेली नाथ-योग्याची मूर्ती कोरण्यात आली आहे. लेणी क्र. २४ ते २८ समूहातील २४ व्या लेण्यात कोणतीही मूर्ती नाही. २५ क्रमांकाचे लेणे अपूर्ण आहे. लेणी क्र. २६, २७ व २८ आकाराने लहान असून यांत वैशिष्ट्यपूर्ण असे काही नाही.

लेणे क्र. २९ हे मुख्य लेणी समूहापासून साधारणतः दीड किमी. अंतरावर आहे. हे लेणे संपूर्णतः नाथ संप्रदायाशी निगडित असून याची रचना इतर लेण्यांपेक्षा निराळी आहे. येथील मुख्य गर्भगृहातील शिल्पांमध्ये आदिनाथ-मत्स्येंद्र-गिरीजा, त्रिपुरसुंदरी व ८४ सिद्ध, तसेच प्रांगणात समोर लक्ष्मी, गणेश व सरस्वती यांची शिल्पे आहेत.


पन्हाळे-काजी हे ठिकाण वज्रयान पंथाचे प्रमुख ठाणे होते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक इतिहासाच्या दृष्टीनेही याचे अत्यंत महत्त्व आहे. येथील लेणी कला व स्थापत्य या व्यतिरिक्त धार्मिक परंपरेत झालेल्या बदलांच्या अभ्यासाच्या दृष्टीनेही महत्त्वाच्या आहेत. पन्हाळे-काजी येथील लेण्यांच्या अभ्यासातून हीनयान बौद्ध पंथाचे तांत्रिक वज्रयान पंथात कसे रूपांतरण झाले व पुढे हे ठिकाण शैव, गाणपत्य व नाथ संप्रदायापर्यंत कसे विकसित होत गेले, हेही समजते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner

# १०. भाजे लेणी




भाजे लेणी ही महाराष्ट्राच्या पुणे जिल्ह्यात मावळ तालुक्यातील भाजे गावाजवळील डोंगरातील
न हिन्दू आणि बौद्ध लेणी आहेत. यामध्ये बौद्ध स्तूप आणि त्याचप्रमाणे यक्ष, गंधर्व, इंद्र व सूर्याची
ं आहेत. गावाजवळ ४०० फूट उंचीवर ही लेणी आहेत. येथील चैत्यगृह महत्त्वपूर्ण आहे. त्याच्या
ला भिक्खूंना राहण्यासाठी असलेल्या खोल्या आढळतात. या लेण्यांना २६ मे, इ.स. १९०९
महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे.

हा लेण्यांचा समूह सुमारे इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकातील असावा. येथे एकुण २२ लेणी
ळतात. त्यात एक चैत्यगृह व २१ विहार आहेत. या लेणी मुळे महाराष्ट्र राज्याला खूप पर्यटक
तात. येथे रोज एक लाख ते दोन लाख पर्यटक येतात.

2407-A द्वारे हे लेणे महत्वाचे राष्ट्रीय
भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण द्वारे अधिसूचना क्रमांक
येथे चैत्य गवाक्षांच्या
क म्हणून संरक्षित आहे. हे महाराष्ट्रातील लेणे बौद्ध हिनायन पंथाचे आहे.
यातील काही सज्जांवर कोरीव
आहेत. त्यांना लागून कोरीव सज्जे बनवलेले आहेत. वेदिकापट्टीवर नक्षीदार कोरीव काम आहे.
ातून जाळी आणि पडद्याचा भास निर्माण केलेला आहे. कोरलेलीही दिसून येतात. तसेच
कोरून काढलेल्या कड्या आहेत. या ठिकाणी गवाक्षातून युगुले स्पष्ट दिसते. कातळात एक
यक्षिणी कोरलेली आहे. या यक्षिणीच्या हातात धरलेले झाड आजही
कमान कोरली आहे. या कमानीला एकूण १७२ छिद्रे पाडलेली आहेत.



Scanned with OKEN Scanner



येथील चैत्य सुमारे १७ मीटर लांब, ८ मीटर रुंद आणि तितकेच मीटर उंच आहे. त्यात सत्तावीस
कोनी खांब आणि मधोमध स्तूप आहे. या खांबांवर कमळ, चक्र अशी चिन्हेही कोरलेली आहेत.
ठिकाणी एक खुंटी आणि तिला अडकवलेला फुलांचा हार कोरलेला आहे.
पाठीमागील खांबांवर बुद्धाची पुसटशी चित्रे दिसून येतात. तर चैत्यस्तूपासमोरील जमिनीवर
सट कोरलेला आढळतो.

चैत्यगृहाला लाकडी तुळ्यांचे छत आहे. या तुळ्यांवर ब्राह्मी लिपीतील लेख आहेत. लाकडी
कलेच्या संकेतांसाठी हे चैत्यगृह उल्लेखनीय आहे.




ण : इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकात भाजे लेणी कोरण्यास सुरुवात झाली असे मानले जाते.
आठशे वर्षे म्हणजेच इसवी सन सहाव्या शतकापर्यंत लेणी निर्मितीची प्रक्रिया सुरू होती.

…च्या दानातून येथील विहार उभे राहिले आहेत व त्यांच्या दानाचे लेख तेथे दिसून येतात.
…ण दिशेस स्वच्छ पाण्याचा स्रोत आहे.

…ल सूर्यलेणे प्रसिद्ध आहे. या लेण्यात पौराणिक प्रसंगांचे पट, सालंकृत-शस्त्रधारी द्वारपाल, वन्यप्राण्यांचे आणि चैत्य-स्तूपांचे नक्षीकाम कोरलेले आहे. यात सूर्य आणि इंद्राचा मानला जाणारा देखावा आहे. …पहिल्या शिल्पात चार घोड्यांच्या रथावर सूर्य स्वार होऊन चालला आहे, रथात त्याच्या मागे-पुढे …ची पत्नी अथवा दासी आहे. त्यातील एकीने वर छत्र धरले आहे तर दुसरी चामर ढाळते आहे. …च्या या रथाखाली काही असुर तुडवले जात आहेत. अनेकांच्या मते ही सूर्यदेवता, रथातील त्या दोघी …च्या पत्नी संज्ञा आणि छाया तर रथाखाली तुडवला जाणारा तो सूर्याचा शत्रू राहू आहे. एका मतानुसार …द्ध असणारे हे शिल्प शक्राचे आहे.





…तिक **महत्त्व** : भारतीय संगीत कलेसंदर्भात हे लेणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण येथे …लेल्या चित्रात एक तबला वाजवणारी स्त्री दिसते आहे. या शिवाय एक नर्तकी नृत्य करतांना येथे …त आहे. या कोरीव कामाने तबला हे वाद्य निश्चितपणे भारतात निर्माण झाले व किमान दोन हजार …पासून वापरात आहे हे निर्विवादपणे सिद्ध होते.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous)
ESTD JUNE 1964



Scanned with OKEN Scanner



*कोरलेल्या चित्रात एक तबला वाजवणारी स्त्री*

तसेच भारतीय नृत्य परंपरा ही किमान दोन हजार वर्षे पुरातन आहे याचा पुरावा ही दिसून येतो. …ला वादनाचे हे आदिम प्राचीन लेणे पाहण्यासाठी अनेक तबला वादक भाजे लेणी अगत्याने हजेरी …तात.

# !! धन्यवाद !!



Scanned with OKEN Scanner